शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं. ७१ / २०१९

| | |
|---|---|
| १. श्री. संजयकुमार रघुनाथ वाईंगडे | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | |
| १. प्राचार्य, मिरज महाविद्यालय,मिरज, जि. सांगली.<br>२. अध्यक्ष, यशवंत शिक्षण संस्था, सांगली, जि.सांगली. | वि. प |

**तक्रारीचे स्वरूप :**

यशवंत शिक्षण संस्था, सांगली, या संस्थेचे मिरज महाविद्यालय, मिरज, जि. सांगली यांचेकडील सहा.प्राध्यापक श्री. संजयकुमार रघुनाथ वाईंगडे विषय मानसशास्त्र यांनी दिनांक १४/०६/२०१९ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमूद तक्रार पुढीलप्रमाणे.

मी यशवंत शिक्षण संस्था, सांगली (कुपवाड) यांच्या मिरज महाविद्यालय, मिरज येथे मानसशास्त्र विषयाचा सहा. प्राध्यापक म्हणुन दि. १५/७/१९९३ पासून काम करीत आहे. नेमणूक दिनांकापासून ३१/०८/२०१५ पर्यंत मला शासन नियमाप्रमाणे घरभाडे भत्ता मिळत होता. माहे सप्टेंबर २०१५ पासून कोणतेही कारण न देता व मला कोणतीही पूर्वसूचना न देता मला मिळत असलेला घरभाडे भत्ता अचानकपणे बंद करणेत आला असून सदर कृती ही पूर्णत: अन्यायी व बेकायदेशीर आहे. त्यामुळे मी व्यथीत झालो असून व्यवस्थापन/प्राचार्यानी केलेली मला घरभाडे भत्ता न देण्याची कृती /निर्णय रद्द ठरवून मला पूर्ववत घरभाडे भत्ता मिळणेसाठी सदर तक्रार अर्ज सादर केला आहे तसेच थकित घरभाडे भत्ता देण्यासाठीही आदेश व्हावेत ही नम्र विनंती.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

श्री. एस. आर. वाईंगडे हे महाविद्यालयात १९९६ सालापासून मानसशास्त्र या विषयाचे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी दिलेल्या कागदपत्रावरून व माहितीवरून प्रशासनाने तयार केलेल्या सेवापुस्तकात तुंग, ता. मिरज हे त्यांच्या वास्तव्याचे ठिकाण अशी नोंद केली आहे. आजतागायत संबंधित शिक्षक हे त्यांच्या मुळ तुंग या गावी वास्तव्यास आहेत. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या तरतुदीनुसार श्री. वाईंगडे यांनी नोकरीच्या ठिकाणी वास्तव्यास असणे अपेक्षित आहे. परंतु प्रशासनाच्या असे लक्षात आले आहे की, श्री. वाईंगडे हे नोकरीच्या ठिकाणी वास्तव्यास नसून देखील त्यांनी सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात लागू असलेला घरभाडे भत्ता घेतला आहे. सदरचा देय नसलेल्या घरभाडे भत्याची वसूली करणे बाबतचा निर्णय महाविद्यालय व्यवस्थापनाने घेतल्याने सदरची वसूली प्रक्रिया सुरू केलेली आहे. त्यामुळे संबंधित शिक्षकावर कोणत्याही प्रकारचा अन्याय केलेला नाही.

**संस्थेचा अभिप्राय :**

श्री. मोरे व श्री. वाईंगडे हे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेतील मिरज शहरात कार्यरत असलेल्या मिरज महाविद्यालय, मिरज या महाविद्यालयाच्या वरीष्ठ विभागामध्ये अध्यापक म्हणून काम करतात. श्री. वाईंगडे हे महाविद्यालयाच्या कार्यस्थळावर वास्तव्य न करता मु.पो. तुंग, ता. मिरज या मिरज शहरापासुन ३० कि.मी. अंतरावर वास्तव्य करतात, तसेच श्री. मोरे हे खटाव, ता. मिरज या मिरज महाविद्यालयाच्या कार्यस्थळापासून ४० कि.मी. अंतरावर वास्तव्य करतात. शासनाच्या कार्यप्रणाली व सेवाशर्तीनुसार शासकीय अथवा शासन अनुदानित संस्थेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने आपल्या कार्यस्थळावर वास्तव्य केलेतरच त्यांना घरभाडे भत्ता अनुज्ञेय आहे.

श्री. मोरे व श्री. वाईंगडे हे कार्यस्थळावर राहत नाहीत हे संस्थेच्या व महाविद्यालयाच्या निदर्शनास आल्यानंतर माहे सप्टेंबर २०१५ पासून त्यांना घरभाडे भत्ता देणे बंद केले आहे. श्री. मोरे व श्री. वाईंगडे यांनी कार्यस्थळावर

वास्तव्य न करता तेथे अनुज्ञेय असलेला घरभाडे भत्ता शासनाची व संस्थेची फसवणूक करूण घेतलेला आहे. त्यावर घेतलेल्या घरभाडे भत्याची वसूली करण्याबाबत संस्थेने निर्णय घेतलेला होता. महाविद्यालयाने त्याबाबत त्यांचेकडून ते सेवेत रूजू झाल्यापासून माहे ऑगस्ट २०१५ पर्यंतचा घरभाडे भत्ता वसूल करण्याचे प्रयत्न केले, परंतु श्री. मोरे व श्री. वाईंगडे यांनी त्यास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. संस्थेने आता त्यांचेविरूद्ध सेवाशर्तीचा भंग केल्याबद्दल व शासनाची व संस्थेची फसवणूक केल्याबद्दल कायदेशीर कारवाई करण्याचे ठरविले आहे.

**समितीची निरिक्षणे :**

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार तसेच संस्थेचे संचालक व महाविद्यालयाचे प्राचार्य हजर होते. तक्रारदार यांचा घरभाडे भत्ता रोखण्याआधी संस्थेकडून तक्रारदारास कारणे दाखवा नोटीस देण्याबाबतची कार्यवाही झालेचे दिसून येत नाही. तसेच संस्था व महाविद्यालय यांचेकडून याबाबत समाधानकारक म्हणणे समितीसमोर आलेले नाही. तक्रारदार दिनांक १५ जूलै १९९३ पासून महाविद्यालयात कार्यरत आहेत. त्यांना नियमानूसार घरभाडे भत्ता वेळोवेळी अदा करण्यात येत होता. परंतू सप्टेंबर २०१५ पासून तो रोखण्यात आला आहे. तो रोखण्यापूर्वी संस्था/महाविद्यालयाकडून आवश्यक ती कार्यवाही अवलंबलेचे दिसून येत नाही.

महाविद्यालयाच्या अभिप्रायामध्ये शासनाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानूसार तक्रारदार यांना घरभाडे भत्ता देय नसल्याने तो अदा केला नाही असे नमूद आहे. तथापी महाविद्यालयाने सदर शासननिर्णय समितीसमोर दाखल केले नाहीत. तसेच घरभाडे भत्ता कपात ही कोणत्याही वस्तूस्थितीवर आधारित आहे असे समितीच्या निर्देशनास आणण्यात आलेले नाही.

तक्रारदार यांनी समितीस तोंडी निवेदनात असेही सांगितले की, घरभाडे भत्ता कपात फक्त तक्रारदार शिक्षकांची रोखली आहे. महाविद्यालयातील अशा प्रकारच्या अन्य शिक्षकांची रोखलेली नाही. या बाबत प्राचार्य अथवा संस्था यांना समाधानकारक उत्तर देता आले नाही.

तसेच एखाद्या कर्मचाऱ्याचा भत्ता रोखण्याबाबत कार्यवाही करताना त्याबाबत योग्य ती चौकशी होणे व कर्मचाऱ्याला त्याची बाजू मांडण्याची संधी देणे हे नैसर्गिक न्यायतत्वाला अनुसरून अपेक्षित आहे. तथापी या प्रकरणी तक्रारदाराबाबत अशी कोणतीही संधी उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळे संस्थेचा घरभाडे भत्ता रोखण्याचा आदेश एककल्ली व नैसर्गिक न्यायतत्वाची पायमल्ली करणारा आहे असे या समितीचे मत आहे व सर्व कागदत्रांचा व तोंडी म्हणण्याचा विचार केल्यावर हाच एकमेव निष्कर्ष निघतो की, संस्थेने तक्रारदाराचा सप्टेंबर २०१५ पासून घरभाडे रोखण्याचा दिलेला आदेश बेकायदेशीर आहे. करीता ही समिती खालील आदेश देत आहे.

## आदेश

संस्था व महाविद्यालय यांनी तक्रारदारास सप्टेंबर २०१५ पासून त्यास देय असलेला घरभाडे भत्ता नियमानूसार हा आदेश प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत आदा करावा. झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन कळविणेत यावे.

दिनांक : 28 FEB 2020

अध्यक्ष
(श्री. एस.पी.कुलकर्णी)

सदस्य
(श्री. व्ही. डी. नांदवडेकर )

सदस्य
(श्री. पी.डी. राऊत)

सदस्य
(श्री. आर.बी.तुपे )

सदस्य
(श्री.एन.बी.गायकवाड)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए. कदम)

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.